**नि. फौ. ख. क्र. ६३/२०२०**
**सरकार वि. प्रतिक वगैरे.**
नि.क्र.

**<u>रोहा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड</u>**
**<u>यांच्या न्यायालयात</u>**

**दोषारोप**

मी एस. एस. महाले, न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा जिल्हा रायगड तुमच्यावर

०१. प्रतिक दत्ता चोरगे,
वय ३४ वर्षे, व्यवसाय–मोलमजूरी,

०२. सौ. शिवानी प्रतिक चोरगे,
वय २८ वर्षे, व्यवसाय–मोलमजूरी,

०३. पुर्वेश दत्ता चोरगे,
वय ३७ वर्षे, व्यवसाय–मोलमजूरी,

०४. दत्ता गोपीनाथ चोरगे,
वय ७० वर्षे, व्यवसाय–मोलमजूरी,
सर्व रा. खारापटी, पो. मेढा,
ता. रोहा, जिल्हा रायगड.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो –

तुम्ही दि.२२.०६.२०२० रोजी दुपारी ०२.३० वा.च्या सुमारास या न्यायालयाच्या स्थळसिमेत, मौजे खारापटी, पो.मेढा, ता. रोहा येथे तुमच्या समान उद्देशाने तुम्ही आरोपी क्र.०१ याने मृत्यू होण्याचा संभव आहे असे साधन म्हणजेच लाकडी दांडका असलेला लोखंडी फावडा फिर्यादीचे कपाळावर मारला व आरोपी क्र.०२ हिने दगड फिर्यादीचे डोक्यात मारून तिला इच्छापुर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२४** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही सर्व आरोपींनी तुमच्या समान उद्देशाने फिर्यादी व साक्षीदार यांना हाता–बुक्क्याने मारहाण करून त्यांना इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३२३** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही सर्व आरोपींनी तुमच्या समान उद्देशाने फिर्यादी व साक्षीदारांस शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **५०४** सह कलम **३४** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.12.21 18:36:19 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस.महाले)
दिनांक २१/१२/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

मोहोर

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2022.12.21 18:36:26 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस.महाले)
दिनांक २१/१२/२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रोहा.